// प्रकरण पाचवे //

# * उस्मानाबाद जिल्हा सर्वांगीण माहिती *

५.१ भौगोलिक स्थिती.

५.२ आर्थिक स्थिती

५.३ सामाजिक स्थिती

५.४ ऐतिहासिक महत्व.

५.५ सांस्कृतिक महत्व.

५.६ शैक्षणिक प्रगती.

// प्रकरण - ५वे //

// उस्मानाबाद जिल्हा सर्वांगीण माहिती //

** उस्मानाबाद जिल्हा सर्वांगीण माहिती :-

उस्मानाबाद जिल्हा हा पूर्वीच्या हैद्राबाद राज्यातील मराठवाडा म्हणवल्या जाणा-या मराठी भाषिक जिल्हयापैकी एक आहे. द्विभाषिक राज्याच्या स्थापनेच्या वेळी १९५६ साली हा जिल्हा द्विभाषिकात मराठवाडयातील उर्वरित चार जिल्हयासह समाविष्ट करण्यात आला. स्वतंत्र महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर हा जिल्हा मराठी भाषिक राज्यात समाविष्ट करण्यात आला. पुर्वी या जिल्हयातएकूण ११ तालुके होते, त्यापैकी लातूर हा या जिल्हयातील तालुका होता. परंतु प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने १६ ऑगस्ट १९८२ साली या जिल्हयाचे विभाजन करून लातूर या नव्या जिल्हयाची निर्मिती करण्यात आली. पुर्वीच्या उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद. तुळजापूर, उमरगा, कळंब, भूम व परंडा हे सहा तालुके आणि सोलापूर जिल्हयाच्या बार्शी तालुक्यातील ८ गावे या जिल्हयात समाविष्ट करण्यात आली आहेत.

उस्मानाबाद जिल्हयात उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, कळंब भूम आणि परंडा हे सहा तालुके असून मराठवाडा विभागात हा जिल्हा खूपच मागासलेला आहे. मराठवाडयातील या मागास अशा जिल्हयातील

शिक्षक प्रशिक्षणा विषयीच्या माहितीसाठी, उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास" हा विषय अभ्यासकाने शोध प्रबंधासाठी [शिक्षणशास्त्र] एम.फील] निवडलेला आहे.

सदरील प्रकारणामध्ये उस्मानाबाद जिल्हयातील भौगोलिक ऐतिहासिक, आर्थिक, लोकसंख्या, सामाजिक सांस्कृतिक आणि शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास हा सविस्तरपणे अभ्यासकाने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. [३]

५.१ ** भौगोलिक स्थिती :-

उस्मानाबाद जिल्हा महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील भागात आहे. जिल्हयाचा बराचसा भाग हा खडकाळ सपाटप्रदेश असून समुद्रसपाटीपासून २००० फुट उंचीवर आहे. या जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ७५१२.४ चौ.कि.मी. असून महाराष्ट्रात त्याचा क्रमांक २४ वा लागतो जिल्हयाच्या एकूण क्षेत्रफळापैकी २४१.४ चौ.की.मी. क्षेत्र [३.२१] नागरी असून उर्वरित ७२७१.० चौ.की.मी. क्षेत्र [९६.७९] ग्रामीण भागांचे क्षेत्र आहे.

उस्मानाबाद, तुळजापूर, कळंब, उमरगा, भूम आणि परंडा हे ६ तालुके असून तहसिल ही त्यांची मुख्यालये आहेत. त्याच प्रमाणे प्रशासनाच्या व महसुलीच्या दृष्टीने स्वतंत्र घटक आहे. जिल्हयाच्या एकूण क्षेत्रफळापैकी उस्मानाबाद जिल्हयाची तालुकावार क्षेत्रफळांची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १] | उस्मानाबाद तहसिल | १५.६३% |
| २] | कळंब तहसिल | १६.६४% |
| ३] | तुळजापूर तहसिल | २१.२६% |
| ४] | उमरगा तहसिल | २०.२६% |
| ५] | भूम तहसिल | ११.९२% |
| ६] | परंडा तहसिल | १४.२८% |

हा जिल्हा बालाघाट डोंगराच्या लहान रांगांनी वेढलेला आहे. मराठवाडयाच्या अतिपुर्वेकडे १७.३५ ते १८.४० उत्तर अक्षांश आणि ७५.१६ ते ७६.४० पूर्व रेखांश यामध्ये वसलेला आहे.[१]

कळंब, भूम, उस्मानाबाद आणि तुळजापूर हे तालुके बालघाट पर्वताच्या कक्षेत वसलेले असून इतर तालुके सपाट प्रदेशावर वसलेले आहेत. जिल्हयाच्या दक्षिण पश्चिमेस सोलापूर जिल्हा, उत्तर पश्चिमेच्या बाजूला अहमदनगर जिल्हा उत्तरेस बीड व ईशान्य पुर्वेच्या दिशेला नवनिर्मित लातुर जिल्हा, दक्षिण पूर्व व दक्षिण दिशेला कर्नाटक राज्यातील बिदर-गुलबर्गा हे जिल्हे आहेत. सोलापूर हे महत्वाचे व्यापारी शहर उस्मानाबाद जिल्हयास सर्वात जवळचे म्हणजे ६७ कि.मी. अंतरावर आहे. सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुका हा बहुतांशी उस्मानाबाद जिल्हयाने वेढलेला आहे.

या जिल्हयाचा कांही भाग गोदावरीच्या खो-यात व कांही भाग भीमेच्या खो-यात मोडतो. परंडा, भूम, तुळजापूर आणि उमरगा तालुक्यांचा कांही भाग सीना नदीच्या खो-यात मोडतो. सीना

नदी ही भिमा नदीची उपनदी आहे. उस्मानाबाद जिल्हयातील सर्व शहरांमध्ये भूम हे शहर समुद्र सपाटीपासून सुमारे ७६० मीटरवर असल्यामुळे सर्वात जास्त उंचीवर आहे. परंडा हे शहर समुद्रसपाटीपासून सर्वात कमी उंचीवर म्हणजेच ५३० मीटर वर वसलेले आहे. पठाराची सरासरी उंची ६०० मिटर आहे. आणि त्याचा दक्षिणेकडील भाग खोलगट असल्यामुळे भिमा नदीच्या खो-यात तो मोडतो. [७]

या जिल्हयातील जमिनीचा भाग हा खडकाळ स्वरुपाचा आहे. ढोबळ मानाने दोन भागात येथील जमिनीची विभागणी होते.

१] भारी व खोल काळी जमिन.

२] कमी खोलीची व हलकी जमिन.

जमिनीच्या वैशिष्टयांमुळे या भागात खरीप व रब्बी पिके घेतली जातात. याच प्रमाणे भात, गहू, तूर, ज्वारी, वाटाणा, डाळी मिरची, ऊस, कापूस, भुईमूग, तीळ, अंबाडी, आंबे, तंबाखू एरंडी इत्यादी प्रमुख उत्पादनेही काढली जातात. [२]

उस्मानाबाद जिल्हयात तेरणा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे

उस्मानाबाद जिल्हयात तेरणा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे उस्मानाबाद व उमरगा तालुक्यातून वहात जाऊन पूर्वेकडील सीमेवर मांजरा नदीस जाऊन मिळते. परंडा तालुक्याच्या पश्चिम सीमेस सीनानदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वहात जाते. बोरी नदी तुळजापूर तालुक्यातून वहात जाऊन खालच्या बाजूस सीना नदीला सोलापूर जिल्हयात मिळते. या नदयां-व्यतिरिक्त उमरगा, तालुक्यात बेनीथोरा, भूम तालुक्यात बाणगंगा

तुळजापूर तालुक्यात बोरी या नदया आहेत. पण त्या नद्या वर्षभर जवळ जवळ कोरडया असतात. या जिल्हयात मोठी तळी व सरोवरे नाहीत. परंतु परंडा तालुक्यात रोसा या गावाच्या आणि डोमगावच्या मध्ये सिना कोळेगाव हे धरण सीना नदीवर तयार होत आहे. या धरणामुळे परंडा, भूम, तसेच सोलापूर जिल्हयातील करमाळा, माढा, तालुक्यातील जमिनी ओलीताखाली येणार आहेत. परंडा आणि करमाळा तालुक्याच्या सिमेवर हे धरण होत आहे.

५.२ ** आर्थिक स्थिती :-

उस्मानाबाद जिल्हयातील प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. तसेच शेतीस जोडधंदा म्हणून काही तालुक्यात पशुपालनातून दुध-उत्पादन केले जाते. कांही तालुक्याच्या ठिकाणी अलिकडे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ [एम.आय.डी.सी.] तर्फे चालणाऱ्या लहानमोठया उद्योगात लोक कामगार म्हणून आपले जीवन जगत आहेत. तसेच या जिल्हयात बहुसंख्य लोक हे मोलमजुरी करून जीवन जगतात. अलिकडील काळात बरेचसे शेतकरी हे फळबागा, ऊसशेती, करतात तसेच या जिल्हयात ज्वारी हे मुख्य पिक घेतले जाते त्याच बरोबर बाजरी, मूग, भुईमूग , कापूस ही खरिपाची पिके घेतली जातात. आपल्या जिल्हयात ज्वारी हे पिक खरिप आणि रब्बी या दोन्ही हंगामात घेतले जाते. तसेच सिना नदीच्या खोऱ्यात उमरगा, तुळजापूर भागात तांदूळ पिकवला जातो. तसेच परंडा, तुळजापूर व उमरगा भागात कापूस पिकतो. जिल्हयात ऊस हे महत्वाचे बागायती पिक आहे. उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा व कळंब भागात ऊस जास्त आहे. ढोकी येथे साखर कारखानाही आहे. फळबागा खूप कमी आहेत. केळी, अंबा, संत्री,

व पेरु इत्यादी फळे पिकतात. तुळजापूर, कळंब, भागात केळी, अंबा, उमरगा व उस्मानाबाद भागात पेरुची झाडे आहेत. तसेच भाजीपाला घेतला जातो. तुरोरी हे उमरगा तालुक्यातील गाव पानमळ्यांसाठी प्रसिध्द आहे.

जिल्हयात बहुतेक भागात गूळ काढण्याचा उद्योग चालतो. कांही लोक सुतारकाम करतात. परंडा, भूम व मुरुम या ठिकाणी हातमागाचा उद्योग चालतो. मेंढयाच्या उस्मानाबाद, भूम व मुरुम या भागात चालतो। उस्मानाबाद, तुळजापूर व परंडा या भागात मातीची भांडी तयार केली जातात. कळंब, भूम व उस्मानाबाद येथे तेलगिरण्या आहेत. शेतीची अवजारे तयार करणे, लोखंडी वस्तू तयार करणे हे उद्योग उस्मानाबाद, नळदुर्ग व भूम भागात चालतात. जिल्हयात ढोकी व तुळजापूर या ठिकाणी साखर कारखाने आहेत. या शिवाय स्टेनलेस, स्टील, ॲल्युमिनिअम यापासून वस्तु तयार करण्याचे उद्योग उस्मानाबाद येथे चालतात.

सर्वांगीण विचार करता उस्मानाबाद जिल्हा हा मागासलेलाच आहे. अलिकडील काळात जिल्हयात वेगवेगळे उद्योग धंदे सुरु होऊ लागले आहे. खेडेगांवातील बहुतेक लोक शेती, शेतकरी, शेतमजूर करणारे आहेत. अलीकडील काळात जिल्हयाची आर्थिक स्थिती सुधारत असल्याचे जाणवत आहे.

५.३ ** <u>सामाजिक स्थिती</u> **

उस्मानाबाद जिल्हयातील समाज व्यवस्थेमध्ये चार वर्ण ब्राम्हण क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे प्राचीन काळापासूनच आलेले आहेत.

शिवाय सर्व जाती जमातीचे आणि मुस्लीम धर्माचे लोक वास्तव्य करून आहेत. ख्रिश्चन, गुजराथी यांचे प्रमाण फारच कमी आहे. मराठा आणि मुस्लीम समाजाचे लोक जास्त प्रमाणात आहेत. मुस्लीम धर्माचे लोक परंडा, उस्मानाबाद, भूम भागात जास्त प्रमाणात वास्तव्य करत आहेत. हिंदू धर्माचे लोक संपूर्ण जिल्हयात आहेत. महार, मांग, चांभार, कुंभार, वडर, पारधी, पुजारी, कोलाटी, लोहार, माळी, घिसाडी, माळी, कैकाडी, सुतार, धनगर, आदि बारा बलुतेदार लोकांचे पण वास्तव्य कायम स्वरूपाचे वास्तव्य कमी जास्त प्रमाणात आहे.

या जिल्हयात कुटूंबपध्दती दोन प्रकारात दिसून येते. त्यामध्ये पुरुष प्रधान कुटूंबपध्दती दिसून येते. कुटूंबपध्दतीमध्ये एकत्र कुटूंब पध्दती आणि विभक्त कुटूंब पध्दती या दोन प्रकारची आहे. जिल्हयातील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. कांहीचा व्यवसाय हा व्यापार आहे, याचे प्रमाण कमी आहे. शेतमजूर, मोलमजूर, रोजदारी करणारे यांचे प्रमाण जास्त आहे. अजूनही येथे बलुतेदारी पध्दती अस्तित्वात आहे. हिंदू, मुस्लीम आणि इतर धर्मातील लोक आपल्या धर्मपध्दती अनुसार सण, समारंभ, विवाह इत्यादी कार्यक्रम पार पाडतात.

येथील पांढरपेशा वर्गाचे प्रमाण जास्त आहे. सहाव्या योजनेत राष्ट्रीय स्तरांवर कुटूंब कल्याण कार्यक्रमास अग्रक्रम देण्यात आला असून त्यासाठी शासकीय कार्यक्रमाध्ये सामाजिक व सेवाभावी संस्थाचे सहाय्यआवश्यक मानले आहे. निव्वळ शस्त्रक्रियांच्या संख्येवर व शिबिरांवर भर न देता कुटूंब नियोजनाचे शिक्षण,

पोषणाच्या गरजा भागविणे प्रतिबंधक लसी टोचणी, आरोग्य केंद्रात सोयी कुटुंब कल्याण इत्यादी बाबी सामाजिक स्थितीच्या विकास होण्यासाठीच नमूद केल्या आहेत.

## ५.४ ** ऐतिहासिक महत्व - उस्मानाबाद -*

जिल्हयाचे पुर्वीचे नांव धाराशिव होते १३१७ मध्ये यादवांचे राज्य दिल्लीच्या सुलतानांनी पूर्णत: आपल्या ताब्यात घेतले. दिल्लीच्या सुलतांनानी दक्षिणेवर राज्य करण्यासाठी मुस्लीम राज्यपाल नेमले. अशा प्रकारे उस्मानाबाद जिल्हा मुसल-मानांच्या अधिपत्याखाली प्रथमच आला. उस्मानाबाद जिल्हा इ.स. १३५७ मध्ये गुलबर्गा या प्रांताचा एक भाग झाला. १५८० मध्ये निजामशाही व आदिलशाही या दोन राज्यांमध्ये फरक वाढू लागला. विजापूरचे सैन्यदल अहमदनगरच्या सैन्यावर हल्ला करण्यास तयार होते. आणि बैजाद - उल - मुल्क जो की धाराशिवला मुक्कामी होता त्याच्या हुकूमाखाली विजापूरचे सैन्यदल हल्ला करण्यासाठी तयार होते. विजापूरच्या सैनदलाने बैजाद - उल - मुल्क याच्यावर अचानक हल्ला करुन त्याची अतिशय शोचनिय परिस्थीती केली.

खानजहान याने याच वेळी विजापूरवर हल्ला केला आणि रणदुल्लाखानवर विजय मिळविला तथापि पाणि आणि रसद मिळविणे त्याला अतिशय अवघड झाले होते म्हणून खान जहान हा धाराशिवला. [सध्याचे उस्मानाबाद] परतला. इ.स. १६६६ मध्ये मोगलांनी परांडया पासून ४४ मैल दूर असलेले ढोकी गाव जिंकले नळदुर्ग पासून २० मैल पूर्वेला असलेले ढोकी गाव जिंकले नळदुर्ग पासून २० मैल पूर्वेला असलेले गुंजोटी गाव

गाव जिंकले आणि तेथून २३ मैल उत्तरेला असलेले निलंगा जिंकले. यानंतर मिर्झाराजे जयसिंग याने आपल्या स्वारीची नविन योजना आखली आणि धारुरला भरपूर सैन्य, रसद, शस्त्रास्त्रे पाठविण्यास तयार झाला आणि हीच तुकडी धाराशिववर हल्ला करण्यासाठी लगेच निघाली.

धाराशिव हे नांव निजाम राजवटीत बदलून उस्मानाबाद ठेवण्यात आले. त्यावेळी या विषयी या भागातील जनतेच्या भावनांचा अजिबात विचार करण्यात आला नाही. इ.स. १९११ ला निजाम महबुब अली खान यांच्या मृत्यू झाला आणि २९ ऑगस्ट १९११ ला सर उस्मानअली खान गादीवर बसले. केवळ नव्या निजाम राज्याच्या राज्यारोहण समारंभा निमित्त या दिवशी पूर्वीचे धाराशिव नाव बदलून उस्मानाबाद हे नांव ठेवण्यात आले. [६]

## ५.५ ** सांस्कृतिक महत्व **

महाराष्ट्रातील प्रसिध्द भवानीमाता मंदिर तुळजापूर येथे आहे. महाराष्ट्रातील भाविक भवानीमातेचे दर्शन घेण्यासाठी येतात. तसेच जिल्हयात येरमाळा येथिल येडेश्वरी मंदिर प्रसिध्द आहे. तसेच या जिल्हयात अनेक थोर संत होऊन गेले आहत. त्यामध्ये संत गोरोबा कुंभार यांचे मंदिर तेर येथे आहे. कल्याणस्वामी यांची समाधी परंडा तालुक्यात डोमगांव येथे आहे. परंडा येथे संत कवी हंसराजस्वामी यांचा मठ आहे. परंडा तालुक्यातसोनारी

येथे भैरवनाथाचे मंदिर आहे. उस्मानाबाद तालुक्यात पडगांव येथे सिद्धेश्वराचे मंदिर आहे. येडशीजवळ असलेले रामलिंग मंदिर प्रसिद्ध आहे. कुंथलगीरी हे जैन लोकांचे पवित्र क्षेत्र आहे. कुंथलगिरी जवळच रामकुंड हे रामाईचे मंदिर प्रसिद्ध आहे. उस्मानाबाद येथे ख्वाजा शम्सउद्दीन गाझीचा मोठा दर्गा आहे.

उस्मानाबाद जवळ काही टेकडया आहेत. त्या सुंदर लेण्यी आहेत. तेर येथे बौद्ध काळातील मोठा स्तूप सापडला आहे. तेथे पुराणवस्तुसंग्रहालय आहे. पूर्वी ही मोठी बाजारपेठ होती. परंडा आणि नळदुर्ग येथे इतिहासप्रसिद्ध किल्ले आहेत. परंडा येथे ख्वाजा बंदरुद्दीन यांचा दर्गा आहे.

या जिल्हयातील दर्गे, पीर, मंदिरे या सर्व वास्तु सर्वधर्म समभाव याचेच प्रतिक आहे. येथील उत्सव सर्वधर्मीय मोठ्या भक्ति-भावाने आणि बंधुभावाने साजरे करतात. प्राचीन भारतीय संस्कृतीचा शिल्पकलेचा अमूल्य ठेवा या जिल्हयाने जतन करून ठेवलेला आहे.

## ५.६ ** शैक्षणिक प्रगती :-

शिक्षणाच्या बाबतीत उस्मानाबाद जिल्हा मागासलेलाच होता. उस्मानाबाद जिल्हा हा मराठवाडा विभागात मोडतो. "मराठवाडा" हा शब्द निजाम, राजवटी पासून रूढ आहे. इ.स.१९२१ च्या खाने सुमारी प्रमाणे निझाम सरकारने हैद्राबाद राज्याचे दोन वि विभाग केले आहेत. त्यात तेलगू भाषा बोलणारे यांच्या विभागाला तेलंगणा तर मराठी भाषा बोलणाऱ्यांच्या विभागाला महाराष्ट्र मराठवाडी अशी नावे होती. यात उस्मानाबाद, बीड, परभणी

नांदेड, उस्मानाबाद, गुलबर्गा, रायचूर, बीदर यांचा समावेश होता. सप्टेंबर १९४८ या दिवशी लष्करी कारवाई होऊन हैद्राबाद राज्यासह वरील आठ जिल्हे भारत सरकारच्या ताब्यात आले आणि त्यांचे विलीनिकरण करुन घेतले. विलीनिकरणानंतर मराठवाडी विभागातील औरंगाबाद, नांदेड, परभणी, बीड आणि उस्मानाबाद हे जिल्हे, महाराष्ट्रात सामील झाले. तसेच सामील झाले. महाराष्ट्रातील जुन्या हैद्राबाद राज्यातील पांच जिल्ह्यांना [औरंगाबाद, नांदेड, परभणी, बीड आणि उस्मानाबाद] मराठवाडा हे नांव रुढ झाले. [३]

औरंगाबाद या विभागीय केंद्राच्या ठिकाणी "मराठवाडा विद्यापिठ आणि सध्याचे नांव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ" औरंगाबाद येथे अस्तित्वात आहे. अशा "मराठवाडा विभागातील शैक्षणिक प्रगती पाहताना अभ्यासकाला असे आढळून आले की, जुन्या हैद्राबाद राज्याच्या जनसंख्येला धरुन पाहिले तर हजारी ३३ लोकांना लिहता वाचता येत होते तत्कालीन ब्रिटीश हिदुस्थानातील इतर प्रांताशी तुलना केली तर या हैद्राबाद राज्याचा नंतर सर्वांच्या शेवटी लागतो. यात मराठवाड्यात लिहता - वाचता येणाऱ्यांची संख्या ही हाजारामागे फक्त २४ व्यक्ति अशी आहे. तसेच स्त्रियांच्या बाबतीत पाहिले तर साक्षर स्त्रियांची संख्या तेलगनात हजाराला फक्त ५ होती. ती पुढे हजारांत १३ पर्यंन्त वाढली. मराठवाड्यातही स्त्री साक्षरता प्रमाण हे हजारात १ पासून हजारात ४ पर्यंन्त वाढलेले दिसते. शैक्षणिक प्रगतीच्या बाबतीत हैद्राबाद राज्यातील तेलंगणा आणि महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा यातील हा फरक प्रामुख्याने जाणवतो. लोक शिक्षणाची तरतुद येथे योग्य रितीने झालेली नव्हती.

हैद्राबाद संस्थानामध्ये इ.स. १९२४ मध्ये फक्त औरंगाबाद येथे एक पुरुषांचे ट्रेनिंग स्कूल आणि एक स्त्रियांसाठीचे ट्रेनिंग स्कूल आणि एक औद्योगिक शाळा अशी स्थिती होती. या शिवाय सामान्य जनतेला उपयोगी पडणाऱ्या वाचनालयांना निजाम सरकारकडून कसलीही मदत मिळत नव्हती. उलट अडचणी निर्माण करण्यात येत होत्या. शिकविण्याचे माध्यम हे मराठी आणि उर्दू असले तरीही उर्दूवर जास्त जोर होता. [३]

इ.स. १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद पोलीस ॲक्शन नंतर भारतात विलीन करण्यात आले. नंतर हैद्राबाद राज्यातील पाच जिल्हे, औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड, आणि उस्मानाबाद हे महाराष्ट्रात सामील करून घेण्यात आले आणि हे जिल्हे "मराठवाडा" या प्रचलित नावाने ओळखले जाऊ लागले. यातील औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन मोठ्या जिल्ह्यांचे विभाजन होऊन १६ ऑगस्ट १९८२ रोजी जालना आणि लातूर असे २ नवे जिल्हे निर्माण झाले या प्रकारे मराठवाड्यातील एकूण जिल्ह्यांची संख्या सात झालेली आहे.

इ.स. १९५१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये तहसिल कार्यालये निर्माण करण्यात आली. इ.स. १९६२ साली जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यानंतर प्राथमिक, माध्यमिक शाळा जिल्हा परिषद शिक्षण खात्याकडे वर्ग करण्यात आले. प्रथमतः उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये उस्मानाबाद येथे शासकीय अध्यापक विद्यालय हे जिल्हा परिषद शिक्षण खात्यामार्फत चालवले जायचे नंतर नळदुर्ग, तुळजापूर आणि उस्मानाबाद येथे अध्यापक विद्यालये सुरु करण्यात आली त्यांना शासनाकडून अनुदान मिळू लागले. पुढे कांही शिक्षणप्रेमी मंडळींनी

विनाअनुदान तत्वावर अध्यापक विद्यालये सुरु केली त्यामध्ये परांडा, गिरवली, उस्मानाबाद, उमरगा येथील अध्यापक विद्यालये आहेत. सध्या उस्मानाबाद जिल्हयात शासकीय - १, अशासकीय अध्यापक विद्यालय [अनुदानित] ३ तसेच विनाअनुदानित अध्यापक विद्यालये - ४, अशी एकूण ८ अध्यापक विद्यालये आहेत. जिल्हयात ५०% अध्यापक विद्यालये अनुदानित आणि ५०% विनाअनुदानित अध्यापक विद्यालये आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास करणे अभ्यासकाला आवश्यक वाटतो.

## // संदर्भ-सूची //

[०१] महाराष्ट्रातील जिल्हे, उस्मानाबाद.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र, शासन मुंबई.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय मुंबई मुद्रित

जानेवारी १९८९.

पृष्ठ क्र. ४ ते ५ पृष्ठसंख्या - ४०.

[०२] महाराष्ट्र - १९८४ :-

संपादक - संतोष दास्ताने, विनय हर्डीकर,

प्रकाशक - रा. ज्यो. दास्ताने, रामचंद्र आणि कंपनी.

८३०, सदाशिव पेठ, पुणे - ३०.

पृष्ठ क्र. १८५ ते १८७ पृष्ठसंख्या - ३१२.

[०३] शर्मा राघवेंद्र भीमराव, ३१-११-१९३४

हैद्राबाद व देशी संस्थाने वैदिक आश्रम, पुणे.

हैद्राबाद राज्य वर्णन भाग ३ रा, पृष्ठ क्र. १६ ते २५

[०४] आपला उस्मानाबाद जिल्हा :-

महाराष्ट्र राज्य, पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम.

मंडळ, पुणे -४

पृष्ठ क्रमांक १ ते ४३ पृष्ठ संख्या ४९.

[०५] शिक्षणशास्त्र पदविका माहिती पत्रक :-

इ.स. १९९३-९४.

[०६] GAZETTEER OF INDIA MAHARASHTRA STATE OSMANABAD DISTRICT :-

Directorate of Government printing, stationery & publications Maharashtra State 1972. (Page No. 23 To 73, 119)

Total Pages- 939

[०७] महाराष्ट्रातील जिल्हे, उस्मानाबाद

पृष्ठ क्रमांक - ६.